# महावितरण कंपनीस भाडेतत्वावर देण्यात येणाऱ्या जागेसाठी अर्जदारास मार्गदर्शक सूचना

१. अर्जदार हे स्वत: शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, को-ऑपरेटीव सोसायटी , वॉटर युजर असोसियेशन, साखर कारखाने, जलउपसाकेंद्र, ग्रामपंचयात व इतर संस्था या पैकी कोणीही असू शकतात.

२. महावितरणला भाडेतत्वावर देण्यात येणाऱ्या जागेचे क्षेत्रफळ **कमीत कमी ३ एकर व जास्तीत जास्त ५० एकर असावे.**

३. जमीन मालकांची संख्या एका पेक्षा जास्त असल्यास त्यांच्या पैकी एकाव्यक्तीला नामनिर्देशित करुन त्या नावाने अधिकार पत्र (Authorization letter) देणे बंधनकारक राहील.

४. अर्जदार/अधिकार प्राप्त प्रतिनिधीने (अद्ययावत-२ महिन्याच्या आतील) सातबारा, ८ अ, फेरफार उताऱ्यांच्या दाखल्याच्या मुळ प्रति पोर्टल वर अपलोड कराव्यात.

५. अर्जदारास महावितरणकडून एक उपभोक्ता क्रं. (beneficiary ID) देण्यात येईल.

६. अर्जदाराने पुढील प्रक्रियेसाठी रु. १०,०००/- + १८% (GST) इतके प्रक्रिया शुल्क भरावे.

७. अर्जा मध्ये काही त्रुटी आढळल्यास त्याची पुर्तता करण्यासाठी अर्जदाराने पुन:श्च महावितरणच्या Web site वर जाऊन माहिती अपलोड करावी.

८. अर्जदार/अधिकार प्राप्त प्रतिनिधीने जागेच्या सर्वेक्षणा साठी जागेवर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

९. महावितरणच्या ३३/११ के.व्ही.उपकेंद्रा जवळील जमीनीला प्राधान्य देण्यात येईल **(५ कि.मी.च्या आतील)**. तथापि अंतिम जागा निश्चित करण्याचे अधिकार प्रकल्प विकासक/महावितरण कंपनीस राहतील.

१०. अर्जदार/अधिकार प्राप्त प्रतिनिधी कडुन प्रस्तावित एका गटातील एका जागे करिता एकच अर्ज स्विकारण्यात येईल.

११. महावितरण कंपनीला भाडेतत्वावर दिलेल्या प्रस्तावित जागे पैकी प्रत्यक्षात हस्तांतरीत केलेल्या जागेचाच करारनामा करण्यात येईल.

१२. महावितरणला भाडेतत्वावर देण्यात येणारी प्रस्तावित जमीन clear title देणे ही जबाबदारी अर्जदाराची असेल.

१३. महावितरणला भाडेतत्वावर देण्यात येणारी प्रस्तावित जमीन ही अतिक्रमण मुक्त, तारण मुक्त, कर्ज मुक्त व इतर कोणत्याही संस्थेचा बोजा मुक्त देणे ही जबाबदारी अर्जदाराची असेल.

१४. महावितरणला भाडेतत्वावर देण्यात येणाऱ्या प्रस्तावित जमीनीची मोजणी नकाशा प्रमाणे हद्द ठरविणे व निश्चित करणे ही जबाबदारी अर्जदाराची असेल.

१५. सदर जमीन शासकीय असल्यास शासन निर्णयानुसार नाममात्र रु.१/- च्या भाडेपट्टीवर ३० वर्षासाठी घेण्यात येईल व खाजगी जमीनी रु. ३०,०००/- प्रती एकर (प्रती वर्ष ३% वाढ) या दराने भाडे तत्वावर घेण्यात येतील.